क्र.कक्ष-१४(३)/क.लि.अन्न/कावि- ३०८ /२०१५.
जिल्हाधिकारी कार्यालय पुरवठा विभाग,वाशिम
दिनांक :- ०८/०५/२०१५.

**महाराष्ट्र शासन**
**अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**ई-निविदा सूचना**

सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत शहरी व ग्रामीण भागाकरीता (ERCMS) Existing Rationcard Management System या संकेतस्थळावर वाशिम जिल्हयातील सर्व शिधापत्रिका धारकाच्या डाटाची मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषेत डाटा एन्ट्री करणे, दुरुस्ती करणे व त्यामध्ये आधार क्रमांक/आधार नोंदणी क्रमांक,बँक खाते क्रमांक, बँक IFSC CODE गॅस धारकाची नोंद घेणे व मोबाईल क्रमांकाचे सिडिंग करणे तसेच संगणीकृत शिधापत्रिकेतील सदस्यांची नवीन नावे सिडींग करणे तसेच शिधापत्रिकांधारकाचे पासपोर्ट आकाराचे फोटो स्कॅनिंग करुन शिधापत्रिकांच्या फॉर्मवर अपलोड करणे तसेच नवीन डाटा एन्ट्री करावयाचे शिधापत्रिका इत्यादीबाबतची (ERCMS) Existing Rationcard Management System या संकेतस्थळावर ONLINE भरणेकरीता कंत्राटदाराची नेमणूक करण्यासाठी खाजगी व्यक्ती अथवा संस्था यांचेकडून याव्दारे ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदरहू निविदा प्रती रेशनकार्ड डाटा एन्ट्रीचे दर निश्चित करण्याकरीता मागविण्यात येत आहे.

निविदा प्रक्रीयेचे वेळापत्रक

| अ.क्र. | करावयाची कार्यवाही | दिनांक |
|---|---|---|
| ०१ | कोरा निविदा फॉर्म | रु. १,०००/- (अक्षरी एक हजार रु.फक्त) |
| ०२ | ईसारा रक्कम | रु. ७५,०००/- (पंच्याहत्तर हजार रु. फक्त) |
| ०३ | सुरक्षा ठेव | रु. १,००,०००/- (एक लक्ष रु फक्त.) |
| ०४ | ई-निविदा विक्रीचा कालावधी | दिनांक १० मे,२०१५ सकाळी १०.०० पासून दिनांक २१ मे,२०१५ रोजी १४.०० वाजे पर्यंत |
| ०५ | ई-निविदा सादर करण्याचा कालावधी | दिनांक १० मे,२०१५ सकाळी १०.०० पासून दिनांक २१ मे,२०१५ रोजी १६.०० पर्यंत ऑनलाईन सादर करता येईल. |
| ०६ | निविदा अर्जाची किंमत व इसारा रक्कम ऑनलाईन भरण्याचा कालावधी | दिनांक १० मे,२०१५ सकाळी १०.०० ते दिनांक २१ मे,२०१५ रोजी १६.०० पर्यंत ऑनलाईन सादर करता येईल. |
| ०७ | ई-निविदा उघडण्याचा दिनांक आणि वेळ | दिनांक २२ मे,२०१५ रोजी दुपारी १५.०० वाजता |
| ०८ | निविदा उघडणेचे ठिकाण | जिल्हाधिकारी, वाशिम यांचे दालनात. |

वाशिम जिल्हयातील (शहर व ग्रामीण विभागाकरीता) एकच दर निविदा मागविण्यात येत आहे. वाशिम जिल्हयातील जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या कार्यालया मार्फत ERCMS या संकेतस्थळावर भरावयाची आहे. उपरोक्त कामाकरीता ई-टेंडरींग अंतर्गत खाजगी/नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ऑनलाईन ई निविदा मागविण्यात येत असून सदर ई निविदा दिनांक २२/०५/२०१५ रोजी दुपारी १५.०० वा. जिल्हाधिकारी अथवा त्यांच्या प्राधिकृत प्रतिनिधी व्दारा उघडण्यात येतील. सदर ई निविदा उघडतेवेळी निविदाधारक किंवा त्यांच्या प्राधिकृत प्रतिनिधीने उपस्थित राहावे.

सदर निविदेची सविस्तर माहिती अटी व शर्ती कामाचे स्वरुपासह www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १०/०५/२०१५ पासून निविदा संच उपलब्ध राहतील.

**जिल्हाधिकारी, वाशिम करीता**

## कामाचे स्वरुप

१) वाशिम जिल्हयातील सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंर्तगत सर्व योजनाच्या संपुर्ण शिधापत्रिकांचे संगणकीकृत ऑन लाईन आज्ञावलीमध्ये डाटा एन्ट्री करण्याचे काम वाशिम मुख्यालयात तसेच तालुका स्तरावर करण्यात यावे.

२) प्रति शिधापत्रिका संबंधीत संपुर्ण एन.आय.सी.च्या आज्ञावलीतील संपुर्ण फील्डच्या नोंदी घेणे .तसेच या संबधीत इतर संगणकीकृत कामे करणे बंधनकारक राहिल .या करिता लागणारी स्टेशनरी व इतर खर्च कंत्राटदारास करावा लागेल.

३) शिधापत्रिकेची माहिती संगणकीकृत करतांना आवश्यक माहिती सबंधाने काही अडचण आल्यास जिल्हा पुरवठा अधिकारी /सबंधीत तहसिलदार /सबंधीत निरीक्षण अधिकारी /सबंधीत पुरवठा निरीक्षक यांचेशी संपर्क साधुन बिनचुक माहिती संगणकीकृत करावी लागेल .डाटा एन्ट्रीमध्ये चुका झाल्यास त्या चुकांची दुरुस्ती करुन फेरतपासणी करुन अंतिम यादया तयार करण्याची संपुर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहिल .

४) सदर काम जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे नियंत्रणाखाली करण्यात यावे .त्यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करावे.

५) संगणकीकृत आज्ञावली डाटा एन्ट्रीचे काम आपले स्वत:चे संगणक सयंत्राव्दारे करावे लागेल. त्याकरिता प्रिंटर ,नेट कनेक्शन व युपीएसकरीता लागणारा खर्च आपण स्वत: करणे बंधनकारक राहिल. ४ जीबी रॅम असलेले विंडो ७ युनिकोड असलेले संगणक वापरणे बंधनकारक राहील व याकरिता लागणारी स्टेशनरी इ.साहित्य स्वत: उपलब्ध करावे लागेल .

६) सदर काम दिनांक ३१/०७/२०१५ पर्यंत पुर्ण करणे बंधनकारक राहील. तसेच दर दिवशी केलेल्या कामाची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी यांना न चुकता सादर करणे बंधनकारक राहील.

७) शिधापत्रिका धारकांची संपुर्ण माहिती जसे कुटुंब प्रमुख व त्यांचे अवलंबीत युनिट यांचे नाव व्यवसायासह आज्ञावलीमध्ये शिधापत्रिका धारकांचे संपूर्ण मार्गातुन मिळणारे (शेती /नोकरी /व्यवसाय) उत्पन्न व इतर संपुर्ण माहिती घेणे आवश्यक राहिल .

८) शिधापत्रिकांची माहिती मराठी व इंग्रजी मध्ये भरणे बंधनकारक राहिल .

९) सर्वोच्च न्यायालयाची याचीका क्रमांक १९६/२००१ दिनांक १४/०९/२०११ मधील संपुर्ण अटीची पुर्तता करणे बंधनकारक राहिल.

१०) संगणकीकृत आज्ञावलीत डाटा तपासनीमध्ये चुका आढळल्यास चुकांची पुर्तता करण्यास येणारा खर्च हा संबधीत कंत्राटदारास यांना करावा लागेल .

११) संगणकीकृत आज्ञावलीत डाटा एन्ट्रीचे काम समाधानकारक नसल्याचे आढळून आल्यास करारनामा रद्द करण्याचा अधिकार मा.जिल्हाधिकारी यांना राहील.

१२) संगणकीकृत आज्ञावलीत डाटा एन्ट्री करण्याचे काम विहीत कालावधीत पुर्ण करावे लागेल व वेळेपर्यंत सदर काम पुर्ण न झाल्यास कालावधी संपल्यानंतर प्रत्येक दिवस १०००/- रुपय दंड अकारण्यात येईल

१३) विद्यूत पुरवठा खंडीत झाल्यास पर्यायी व्यवस्था करण्याची जबाबदारी कंपनीची राहिल .

१४) अर्जदाराचा फोटो SCAN करुन माहिती सोबत अपलोड करावी लागेल .

१५) रेशनकार्ड डाटा एन्ट्री व कुटुंबाच्या तपशिलाचे विवरण कार्यालयातुन उपलब्ध होईल .

१६) निविदेसाठी जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे क्षेत्रात तालुका हा घटक मानण्यात यावा .

१७) डाटा एन्ट्री ऑपरेटर हा मराठी व इंग्रजी दोन्ही भाषा जाणणारा असावा .

१८) डाटा एन्ट्री ऑपरेटरनी केलेली कामे रोजच्या रोज तपासली जाण्यासाठी पुरेशा पर्यवेक्षकांची नियुक्ती एजन्सीने करावी .व पर्यवेक्षकांनी सदर माहिती तालुका समन्वयकाकडून तपासुन घ्यावी .

१९) शिधापत्रिकांची डाटा एन्ट्री /दुरुस्ती झाल्यानंतर त्याच दिवशी प्रिंट काढून कार्यालयाला अंतिम तपासणीसाठी देण्यात यावे .

२०) डाटा एन्ट्री / दुरुस्तीचे काम शिधावाटप दुकाननिहाय काम पूर्ण करण्यात यावे.

२१) एजन्सीला प्रतिदिन किमान ५००० /- पाच हाजार शिधापत्रिकांची एन्ट्री करणे बंधकारक राहिल. त्याप्रमाणात मनुष्यबळ व संगणक उपलब्ध करणे आवश्यक राहिल .

जिल्हाधिकारी, वाशिम

## निविदेसाठी अटी व शर्ती

**विषय :-** सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागाकरीता **(ERCMS) Existing Rationcard Management System** या संकेतस्थळावर शिधापत्रिकाच्या डाटाची मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषेत डाटा एन्ट्री करणे, दुरुस्ती करणे व त्यामध्ये आधार क्रमांक/आधार नोंदणी क्रमांक, बँक खाते क्रमांक, बँक **IFSC CODE,** गॅस धारकांची नोंद व मोबाईल क्रमांकाचे सिडींग करणे,पीन कोड क्रमांक टाकणे तसेच संगणकीकृत शिधापत्रिकेतील सदस्यांची नावे सिडींग करणे तसेच शिधापत्रिकाधारकाचे पासपोर्ट आकाराचे फोटो स्कॅनिंग करुन शिधापत्रिकाच्या फॉर्मवर अपलोड करणे या बाबी **ERCMS** मध्ये भरण्याकरीता काढण्यात येणाऱ्या निविदेतील अटी व शर्ती.

| अ.क्र | कार्यालयाचे नाव | शिधापत्रिकांची संख्या |
|---|---|---|
| १ | जिल्हा पुरवठा अधिकारी ,वाशिम | २,८८,६३८<br>यामध्ये घटवाढ होण्याची शक्यता आहे. |

१) उपरोक्त बाबीकरीता ई- निविदा पध्दतीने निविदा सादर करण्यात यावी.
२) इसारा रक्कम रु. ७५००० / (अक्षरी - पंच्चाहत्तर हजार रुपये ) .
३) सुरक्षा ठेव निविदा मंजुर झाल्यानंतर रु १००००० / (अक्षरी - एक लक्ष रुपये फक्त )
४) निविदा फॉर्मची किमत रु १०००/ (अक्षरी- एक हजार रुपये फक्त ना परतावा.)
५) अनुभव निविदादारास सादर कामाचा शासकीय किंवा खाजगी संस्थेतील किमान दोन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

**(I)** लिफाफा अ - (तांत्रिक) मध्ये टेक्नीकल बीड अपलोड करतांना त्यामधील आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे राहतील.

१) इसारा रक्कम रु. ७५०००/ - ऑनलाईन शासन जमा करणे.
२) निविदाअर्ज
३) काम विहीत मुदतीत पुर्ण करण्याबाबत रु. १००/ - चे स्टॅम्प पेपरवर हमीपत्र.
४) मागील वर्षाचे आयकर रिटर्न विवरणपत्र.
५) शासकीय किंवा खाजगी संस्थेतील किमान दोन वर्षाचा अनुभव असलेने प्रमाणपत्र.
६) संगणक एजन्सीतआवश्यक असलेले व्यवसायाचे नोंदणी प्रमाणपत्र.
७) सर्विस, टॅक्स नोंदणी प्रमाणपत्र.
८) सर्व्हर, संगणक व प्रिंटर उपलब्धेतेची तपशिलवार माहिती
९) पॅन कार्डची छायाकीत प्रत

(II) लिफाफा "ब" मध्ये - अपलोड करतांना त्यामध्ये आवश्यक कागदपत्रे खालील प्रमाणे राहतील प्राईस बीड (व्यापारी /दरा संबंधीचा लिफाफा)

१) फक्त दराचा उल्लेख राहील. दर हे शिधापत्रिका (राशनकार्ड मास्टर डाटा एन्ट्री) यांचे प्रती शिधापत्रिका एन्ट्रीप्रमाणे राहतील. प्रति रेशनकार्ड प्रमाणे दराचा विहीत नमुना यासोबत स्वतंत्रपणे जोडलेला आहे. उपरोक्त बाबीकरीता एकच दर सादर करणे आवश्यक आहे.

२) निविदाकारांना ई निविदा प्रक्रीयेत भाग घेण्याकरीता उपरोक्त संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक राहील.

३) ई निविदा अर्ज करीता रु. १०००/- (अक्षरी एक हजार रु.फक्त) ऑनलाईन खरेदी करीता येईल.

४) शासनाकडून उपरोक्त कामाकरीता निधी उपलब्ध झाल्यानंतरच कंत्राटदारास देयक अदा करण्यात येईल.

५) ई-निविदा कामाचे स्वरुप व कामकाजा बाबत काही अडचणी किंवा सूचना असल्यास जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम यांचेशी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष संपर्क साधून निवारण करता येईल.

६) सर्व कागदपत्रे ऑनलाईन भरणे बंधनकारक असून कोणतेही कागदपत्र प्रत्यक्ष स्वरुपात स्विकारले जाणार नाही. इसारा रक्कम ऑनलाईन भरणे बंधनकारक राहील.

७) कंत्राटदाराकडून तांत्रिक लिफाफा "अ" मधील कोणत्याही कागदपत्राची पुर्तता न झाल्यास त्यांना अपात्र घोषीत करण्यात येईल व अशा निविदाकाराचे दराचे लिफाफे उघडण्यात येणार नाही.

८) सदर काम दिनांक ३१ जूलै, २०१५ अखेर पुर्ण करावयाचे असल्याने कंत्राटदारास प्रतिदिन संकेतस्थळावर भरावयाच्या माहिती करीता संगणक व ऑपरेटरची इंटरनेट सुविधा आवश्यकतेनुसार जागेसह उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

९) निविदाकारांना निविदा प्रक्रीयेचे वेळी **Rate Analysis** सह सादर केलेल्या दराचे बाबीनिहाय समर्थन करणे आवश्यक राहील. तसेच विहित कालावधीत काम पूर्ण करण्याकरीता उपलब्ध संगणकाची व ऑपरेटरची संख्या, ८ तासाप्रमाणे दिवसातील एकूण दोन शिफ्ट सह मास्टर प्लॉन सादर करुन कामाच्या पुर्तते संबंधी समाधान करणे आवश्यक राहील. जो निविदाकार **Rate Analysis** व मास्टर प्लॉनसह समर्थन करु शकणार नाही व विहीत कालावधीत काम पुर्ण करु शकणार नाही याची खात्री झाल्यास अशा निविदाकारांना काम देता येणार नाही. याची नोंद घ्यावी.

१०) कोणतेही कारण न देता सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा किंवा प्रक्रीया रद्द करण्याचा अधिकार मा. जिल्हाधिकारी,वाशिम यांनी राखुन ठेवलेला आहे.

## इतर शर्ती व अटी

१) तांत्रिक लिफाफा "अ" यामध्ये सादर करावयाच्या सूची मध्ये नमुद कागदपत्रा पैकी कमी कागदपत्रे आढळल्यास ती निविदा अपात्र ठरविणे किंवा कमी आढळलेले कागदपत्रे सादर करण्याकरीता संधी देण्याबाबतचे अधिकार जिल्हाधिकारी, वाशिम यांना राहतील. लिफाफा "ब" उघडल्यानंतर तांत्रिक लिफाफा "अ" बाबत कोणतेही आक्षेप मान्य करता येणार नाही. लिफाफा "ब " मध्ये दर अंकात व अक्षरात नमुद करण्यात यावेत. दराची छायांकीत प्रत ग्राहय धरल्या जाणार नाही. तसेच निविदेत कोणतेही अट अथवा पर्याय देता येणार नाही. अशा काही अटीचा समावेश निविदेत असल्यास त्या नाकारल्या जातील व निविदा अपात्र

ठरविण्यात येईल. लिफाफा "ब" मधील नमुद दरामध्ये कोणतेही खोडातोड असल्यास ती ग्राहय धरल्या जाणार नाही.

२) निविदा मंजूरी नंतर कंत्राटदारास तीन दिवसाच्या आत रु. १००/- चे स्टॅम्प पेपरवर आवश्यक अटी व शर्तीवर करारनामा करणे बंधनकारक राहील. त्यानंतरच कार्यादेश देण्यात येतील. करारनामा करण्यास नकार दिल्यास किंवा टाळाटाळ केल्यास निविदाकाराची संपूर्ण इसारा रक्कम जप्त करुन लगतच्या न्युनतम दर असलेल्या निविदाकाराची निविदा मंजूर करण्यात येईल.

३) ज्यांनी इसारा रक्कम भरलेली असेल त्यांना निविदा मंजूर करण्यात येईल. निविदा न भरल्यास त्यांची इसारा रक्कम सरकार जमा करण्यात येईल. आवश्यकतेपेक्षा कमी इसारा रक्कमेचा भरणा केला असल्यास अशा निविदाकाराची निविदा सुध्दा अपात्र ठरवून भरलेली संपुर्ण रक्कम सरकार जमा करण्यात येईल.

४) फेर निविदा झाल्यास किंवा निविदेला मुदतवाढ देवून पुन्हा निविदा मागविल्यास तांत्रिक लिफाफा "अ" मध्ये पात्र ठरलेल्या निविदाकारास पहिल्या व दुसऱ्या मुदत वाढीनुसार निविदा सादर करण्याच्या दिनांकास विहीत वेळेपूर्वी दराचा लिफाफा "ब" पुन्हा सुधारीत सादर करण्याची मुभा राहील.

५) अंतिम दिनांक व विहीत वेळेनंतर निविदा अर्ज स्विकारल्या जाणार नाही.

६) संपूर्ण निविदा अथवा निविदेचा काही भाग कोणतेही कारण न देता स्विकृत/अस्विकृत किंवा रद्द करण्याचा अधिकार मा.जिल्हाधिकारी, वाशिम शासन यांचेकडे राखुन ठेवण्यात येत आहे.

७) निविदाकारास त्यांनी आयकर रिटर्न/विवरणपत्राची छायांकित प्रत निविदेसोबत सादर करणे बंधनकारक राहील.

८) उपरोक्त अटी व शर्ती बाबत काही अडचणी असल्यास जिल्हा पुरवठा अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम यांचेशी कार्यालयीन वेळेत शासकीय कामकाजाच्या दिवशी प्रत्यक्ष संपर्क साधून निवारण करुन घेता येईल.

९) कंत्राटदारास देय असलेल्या रक्कमेतून आयकर अधिनियम-१९६१ चे कलम १९४ (सी) मधील तरतुदी नुसार प्रचलित दराने आयकराची रक्कम कपात करण्यात येईल.

१०) एकदा मंजूर झालेल्या दरामध्ये कुठलेही दर वाढ मंजूर करण्यात येणार नाही.

११) कंत्राटदारास वाशिम मुख्यालयीन काम करावयाचे असल्याने आवश्यक मनुष्य बळ संगणकाचे पुरेशे ज्ञान असलेले ऑपरेटर उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधीत कंत्राटदाराची राहील.

१२) शासकीय कामकाजाचे दिवस वगळता इतर सुटीच्या दिवशी सुध्दा कंत्राटदारास काम करण्याची आवश्यकता भासल्यास त्याप्रमाणे सुटटीचे दिवशी काम करावे लागेल.

१३) करारनाम्याचे कालावधी किंवा त्यानंतर कोणताही विवाद उदभवल्यास त्याकरीता शासन जबाबदार राहणार नाही.

१४) कंत्राटदारास वाशिम मुख्यालयी काम करावयाचे असल्याने आवश्यक डाटा एन्ट्रीचे काम स्थानिक भाषेत करण्यासाठी युनिक कोड मराठी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधीत कंत्राटादाराची राहील.

१५) निविदा उघडण्याची तारीख व वेळ यामध्ये आवश्यक असल्यास बदल करण्याचे किंवा स्थगित करण्याचे किंवा रद्द करण्याचे अधिकार कार्यालयाने राखून ठेवलेले आहे.

१६) प्रति शिधापत्रिका संबंधीत एन.आय.सी. च्या आज्ञावलीतील संपूर्ण नोंदी घेणे तसेच या संबंधीत इतर संगणकीकृत कामे करणे बंधनकारक राहील. त्याकरीता लागणारी स्टेशनरी व

इतर खर्च कंपनीला करावा लागेल. इंटरनेट कनेक्शन यु.पी.एस. इत्यादी करीता लागणारा खर्च निविदाकारास स्वत: करणे बंधनकारक राहील.

१७) निविदाकारास सदर काम विहीत मुदतीत म्हणेज दिनांक ३१ जूलै, २०१५ पर्यंत पुर्ण बंधनकारक राहील. तसेच दर दिवशी केलेल्या कामाची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी यांना नचुकता करावी लागेल. विहीत कालावधीत काम पुर्ण न झाल्यास प्रतिदिवस रु. १०००/- (अक्षरी एक हजार रु. फक्त) प्रमाणे दंड आकारण्यात येईल. अपवादात्मक परिस्थीत सदर कंत्राटास मुदतवाढ देण्याचे अधिकार मा. जिल्हाधिकारी, वाशिम यांना राहतील.

१८) शिधापत्रिका धारकांची संपूर्ण माहिती जसे कुटूंबप्रमुख व त्यांचे अवलंबित युनिट यांचे नाव ,व्यवसाय सह आज्ञावलीमध्ये शिधापत्रिका धारकांचे संपूर्ण मार्गातून मिळणारे शेती/नोकरी/व्यवसाय उत्पन्न व इतर संपूर्ण माहिती भरणे आवश्यक राहील.

१९) संगणकीकृत आज्ञावलीचे काम समाधानकारक नसल्याचे आढळल्यास करारनामा रद्द करण्याचे संपुर्ण मा. जिल्हाधिकारी,वाशिम यांना राहतील.

२०) अर्जदाराचा फोटो स्कॅन करुन माहिती सोबत अपलोड करावा लागेल.

२१) रेशनकार्ड डाटा एन्ट्री व कुटूंबाच्या तपशिलाचे विवरण कार्यालयात उपलब्ध होईल.

२२) सदर कामाचे देयक शासनाकडून निधी उपलब्ध झाल्यानंतरच निर्गमित करण्यात येतील. तसेच कंत्राटाचे पुर्ण प्रदान डाटा एन्ट्रीचे काम पुर्ण झाल्यावर व सर्व तहसिलदार/परिमंडळ अधिकारी यांचेकडून काम पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच एकमुस्त अदा करण्यात येईल.

२३) निविदाधारकांने राष्ट्रीयकृत बँकेची एक वर्षाची बँक ग्यारंटी रु. १,००,०००/- (एक लक्ष रु. फकत) संबंधी हमी पत्र करारनाम्याचे वेळी सादर करणे बंधनकारक आहे.

२४) निविदेतील सर्व अटी व शर्ती नुसार काम पुर्ण झाल्याबाबतचे सर्व संबंधीत सक्षम अधिकाऱ्याचे /तहसिलदाराचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय कंत्राटदारास देयकाची रक्कम अदा करता येणार नाही.

२५) उपरोक्त कंत्राटाचे कालावधीत शिधापत्रिकेच्या संख्येत वाढ झाल्यास त्यानुसार जबाबदारी सांभाळणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

२६) कंत्राट कालावधीत कंत्राटदार अथवा त्याचे प्रतिनिधीस होणाऱ्या संभाव्य नुकसानी बाबत जसे अपघात आग लागणे ,भाववाढ ,इतर नैसर्गिक अथवा मानवनिर्मित आपत्तीमुळे होणाऱ्या कुठल्याही आर्थिक हानी करीता नुकसान भरपाई कंत्राटदारास दिली जाणार नाही .

२७) कंत्राटदारास भारतीय दंड संहितेच्या कोणत्याही कलमान्वये शिक्षा झाली असल्यास ,अथवा काळ्या यादीत नाव घोषीत केले असल्यास अशा कंत्राटदाराने त्याचे स्वत:चे किंवा नातेवाईकाचे नावे निविदा भरु नये अशा कंत्राटदारांना देण्यात येणारी निविदा रद्द करण्याचा अधिकार मा.जिल्हाधिकारी यांना राहील.

२८) निविदेसाठी जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे क्षेत्रात तालुका हा घटक मानण्यात यावा .

२९) डाटा एन्ट्री ऑपरेटर हा मराठी व इंग्रजी दोन्ही भाषा जाणणारा असावा .

३०) डाटा एन्ट्री ऑपरेटरनी केलेली कामे रोजच्या रोज तपासली जाण्यासाठी पुरेशा पर्यवेक्षकांची नियुक्ती एजन्सीने करावी .

३१) शिधापत्रिकांची डाटा एन्ट्री /दुरुस्ती झाल्यानंतर त्याच दिवशी प्रिंट काढून कार्यालयाला अंतिम तपासनीसाठी देण्यात याव्यात .

३२) डाटा एन्ट्री /दुरुस्तीचे काम शिधावाटप दुकाननिहाय काम पुर्ण करण्यात यावे .

३३) निविदा प्रक्रियेदरम्यान निविदाकारास त्यांनी सादर केलेले दराबाबत समर्थनीय कारणे स्पष्ट करावी लागतील जसे एकुण लागणारे संगणक व त्यांच्या जागेचे भाडे, स्टेशनरी ,वीज बिल ,ऑपरेटरचे मानधन व त्यांचे चहा नास्ता ,इंटरनेटचा खर्च व इतर किरकोळ खर्चासह निविदाकाराचा निव्वळ नफा ,सर्व्हीस टॅक्ससह एकुण सादर केलेले दराचे **rate analysis** सर्मथन करणे आवश्यक राहिल .तसेच कंत्राटाचे कामाकरिता अल्प कालावधी असल्याने किती शिप्ट मध्ये (८ तासाप्रमाणे एका दिवसात दोन किंवा तिन शिप्टमध्ये ) काम करणार ,कामाची जागा संगणकांची व ऑपरेटरची उपलब्धता कशी करणार एकुणच विहित मुदतीत कंत्राटाचे काम कसे पुर्ण करणार याबाबत मास्टर प्लानसह पर्ण समर्थन निविदाकारास द्यावे लागेल . निविदेतील नमूद अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा अधिकार मा.जिल्हाधिकारी यांना राहिल.

३४) निविदाकारास देयक अदा करतांना त्यांनी निविदेमध्ये नमूद केलेले प्रति शिधापत्रिका प्रमाणे जे दर नोंदविलेले असेल तेवढीच रक्कम देण्यात येईल. त्यावर कोणत्याही प्रकारचे कर या कार्यालयाकडून देण्यात येणार नाही. परंतू एकूण देयक रक्कमेवर नियमाप्रमाणे आयकर कपात (TDS) करण्यात येईल.

जिल्हाधिकारी, वाशिम